


शिल्पकार विकासाचा...

# देशदूत




इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक ६७ । रविवार, दि.२ मार्च २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर




# निलंबन नव्हे थेट बडतर्फच!

## मुख्यमंत्री फडणवीसांचा पोलीस यंत्रणेला इशारा

**ठाणे ।** ड्रग्सच्या केसमध्ये कोणत्याही पदावरील पोलीस अधिकारी आढळून आला तर त्याच्यावर निलंबनाची कारवाई होणार नाही. त्याला थेट बडतर्फ केले जाईल, त्यासंदर्भात अशा सूचना दिल्या आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शनिवारी ठाण्यात महाराष्ट्र पोलीस परिषद झाली. त्यात विविध विषयांवर चर्चा झाली. त्याची माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, परिषदेत देशात नवीन तयार झालेल्या तिन्ही कायद्यांचे अंमलबजावणीचे सादरीकरण झाले. सायबर प्लॅटफॉर्म सादरीकरण झाले. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी आरोपपत्र जलद गतीने न्यायालयासमोर वेळेत कसे जाईल त्यावर चर्चा झाली. ड्रग्ससंदर्भात कठोर



कारवाई करण्याचे निर्देश दिले. ड्रग्ससंदर्भात झिरो टोलरन्सी पॉलिसी असणार आहे. या प्रकरणात कोणताही पोलीस कर्मचारी किंवा कोणत्याही रँकमधील अधिकारी सापडला तरी त्याला थेट बडतर्फ करण्यात येईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### कठोर शिक्षेसाठी प्रयत्न

संतोष देशमुख हत्याप्रकरणी पोलीस सुरुवातीपासून कठोर तपास करीत आहेत. संपूर्ण पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केला आहे. ॲड.उज्ज्वल निकम यांची या प्रकरणात सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे. त्यामुळे आरोपींना कठोरात कठोर शिक्षा मिळावी, असा प्रयत्न राहणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### लोकांची संपत्ती परत मिळणार!

उद्योगांना कोणताही त्रास होऊ नये. तसेच महिला अत्याचारासंदर्भात वेळेत आरोपपत्र दाखल व्हावे हा प्रयत्न असेल. त्याचे ट्रॅकिंग आम्ही करत आहोत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. नवीन कायद्यात एखाद्या गुन्ह्यात लोकांची जप्त केलेली संपत्ती परत करण्याची तरतूद तयार केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी लवकरच केली जाईल. सहा महिन्यांत लोकांचा मुद्देमाल परत गेला पाहिजे. म्हणजे पोलीस ठाणे रिकामी होतील, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## खबरदार... खोटा आरोप कराल तर!

### आरोप करणाऱ्या महिलेवर दाखल होणार गुन्हा

**तिरुअनंतपुरम ।** देशात महिलांवर होणाऱ्या लैंगिक असत्याचारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. अशा प्रकारचे अनेक खटले न्यायालयासमोर येत असतात. मात्र दुसरीकडे पुरुषांना अशा खोट्या खटल्यात अडकवण्याचे प्रमाणही वाढले आहे. अशा परिस्थितीत केरळ उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. लैंगिक शोषणाचे खोटे आरोप केल्यास अशा महिलेविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करावा असेआदेशात स्पष्ट केले आहे.



यांप्रकरणी आदेश देताना कोर्टाने सांगितले की, जर एखाद्या महिलेने केलेले आरोप खोटे असल्याचे दिसून आले, तर तक्रारकर्त्या महिलेविरोधात कारवाई करा. सर्व महिलांनी केलेले लैंगिक शोषणाचे आरोप हे खरे असू शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणात विस्तृत तपास होणे आवश्यक आहे. खोट्या तक्रारींमुळे केवळ अधिकारीच नाही तर न्यायालयांच्या वेळेचाही अपव्यय होतो. कोर्टाने लैंगिक शोषणाच्या पान २ वर

आरोपीने तक्रारकर्त्या महिलेसोबत अनेकदा लैंगिक संबंध प्रस्थापित केले होते. आरोपीवर महिलेला बेकायदेशीररीत्या कैद करण्यासह, एकाच महिलेवर वारंवार बलात्कार केल्याचा आरोप ठेण्यात आला होता. मात्र मला तक्रारदार महिलेसोबत लग्न करायचं होते. मात्र ही महिला विवाहित असल्याचे आणि दोन मुलांची आई मला नंतर समजले, असा दावा आरोपीने केला होता. या प्रकरणात याचिकाकर्ता आणि तक्रारदार महिला यांच्यात परस्पर सहमतीने लैंगिक संबंध प्रस्थापित झाले होते, असे न्यायालयाच्या निदर्शनास आहे. फसवणुकीच्या माध्यमातून सहमती मिळवली जाते, तेव्हाच तो गुन्हा ठरते. दरम्यान, लग्नाचे आश्वासन मिळाल्याने आपण लैंगिक संबंध प्रस्थापित केले, असे तक्रारकर्तीने सांगितले. मात्र जर एखादी विवाहित महिला घटस्फोट न घेताच लग्नाचे आश्वासन मिळाले म्हणून कुण्या अन्य व्यक्तीसोबत लैंगिक संबंध ठेवत असेल, तर परिस्थिती बदलते. अशा परिस्थितीत लग्नाचे आश्वासन हे निरर्थक ठरते. तसेच हे आरोपही निराधार ठरतात, असेही कोर्टाने स्पष्ट केले.

## थोडक्यात

### मुख्य प्रतोदपदी अमित देशमुख

**मुंबई ।** राज्य विधिमंडळाच्या



अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने शुक्रवारी विधिमंडळ पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या घोषित केल्या. त्यानुसार विधानसभेत मुख्य प्रतोदपदी अमित देशमुख, उपनेते पदावर अमीन पटेल आणि सचिव म्हणून विश्वजित कदम यांची नेमणूक करण्यात आली आहे. मुख्य प्रतोद म्हणून अभिजित वंजारी आणि प्रतोद म्हणून राजेश राठोड यांना नेमण्यात आले आहे.

### चमोलीमध्ये २५ कामगारांचा शोध सुरु

**चमोली ।** बद्रीनाथ धाम येथे उपस्थित असलेले सैन्य आणि आयटीबीपी बेपत्ता कामगारांचा शोध घेत आहेत. आतापर्यंत बर्फाखाली अडकलेल्या ३२ जणांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले आहे. त्यांच्यावर माना येथील आयटीबीपी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. २५ जण अजूनही बेपत्ता आहेत. उत्तराखंडच्या पर्वतीय भागात सतत बर्फवृष्टी होत असल्याने कर्फ्यूसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. बर्फवृष्टीमुळे अनेक मार्ग बंद झाले आहेत.

## आरोपी क्रमांक १ वाल्मीक कराड

### सीआयडीच्या आरोपपत्रात आठ आरोपींची नावे

**बीड ।** संतोष देशमुख हत्या प्रकरणासह एकूण तीन गुन्ह्यात सीआयडीने एकत्रित आरोपपत्र दाखल केले आहे. यात खंडणीच्या प्रकरणातूनच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली असून, वाल्मीक कराड हाच याचा मुख्य सूत्रधार असल्याचे आरोपपत्रात म्हटले गेले आहे. त्यामुळे इतक्या दिवसांपासून देशमुख कुटुंबीय आणि इतरांकडून वाल्मीक कराडवर केल्या जाणाऱ्या आरोपांना कागदोपत्री दुजोरा



संतोष देशमुख हत्या प्रकरण

मिळाला आहे.

सीआयडीने संतोष देशमुख हत्या, दोन कोटींची खंडणी आणि ॲट्रॉसिटी गुन्हा या तिन्ही प्रकरणात १५०० पानी आरोपपत्र केज न्यायालयात दाखल केले आहे. यातील काही मुद्दे आता समोर आले असून, यात आठ प्रमुख आरोपी करण्यात आले आहेत. वाल्मीक कराडला सूत्रधार ठरवण्यात आले असून, त्याचे नाव पहिल्या क्रमांकावर आहेत.

सीआयडीच्या आरोपपत्रात वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुल, जयराम चाटे, सुधीर सांगळे, सिद्धार्थ सोनवणे, कृष्णा आंधळे यांची नावे आहेत.

## भरधाव ट्रकने तरुणाला चिरडले

**जळगाव ।** ममुराबाद येथील अरुणामाई कॉलेज ऑफ फार्मसी



महाविद्यालयात दुचाकीने जात असताना भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने तरुण जागीच ठार झाला तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला. घटना सकाळी १० वाजता घडली. फैसल मुस्ताक पटेल (वय २०) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर वासीक खान युसुफ खान (वय २०, रा.मास्टर कॉलनी, जळगाव) हा जखमी झाला आहे.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | 2050 |
| नवती (२) | 1850 |

## मिश्कीली




## ३२०० करोडच्या कामांना स्थगिती

### फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना आणखी एक धक्का



**मुंबई ।** माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात घेतलेल्या काही निर्णयांना विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा शिंदे सरकारच्या काळात आरोग्य विभागासाठी घेतलेला निर्णय स्थगित करण्यात आला आहे. माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या काळात दिलेले ३,२०० कोटी रुपयांचे काम रद्द करण्यात आले आहे.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तानाजी सावंत यांच्याकडे आरोग्य पान २ वर

### नियमानुसारच काम व्हावे-आरोग्य मंत्री

या निर्णयावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुरू असलेले सुप्त द्वंद कारणीभूत असल्याचा संशय विरोधक व्यक्त करत आहते. पण सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मात्र वेगळीच प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, सदर निर्णयामागे पक्षीय कारण नाही. फक्त आरोग्य विभागच नाही तर प्रत्येक सरकारी विभागाने नियमानुसार काम केले पाहीजे. आम्ही जनतेला उत्तरदायी आहोत.

## कॉपीमुक्त अभियानात पालकांचा खोडा!

**मुंबई ।** बोर्डाच्या परीक्षा सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी शिक्षण विभाग आणि बोर्डाचा धाक असतो. परंतु संभाजीनगरमध्ये वेगळाच प्रकार घडलाय. मुलांना कॉपी करू द्या असा पालकांचा शिक्षण विभागावर दबाव असल्याचा उलटा प्रकार घडलाय. यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ माजली आहे. सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. राज्यात परिक्षेदरम्यान अनेकठिकाणी कॉपीचा सुळसुळाट पाहायला मिळतोय. कॉपी बहाद्दरांमुळे सरकारच्या कॉपीमुक्त अभियानाचा पुरता फज्जा उडाला आहे. त्यातच संभाजीनगरमध्ये पालकांनीच आमच्या मुलांना कॉपी करु द्या म्हणत शिक्षण विभागावर दबाव टाकलाय. मुलांना कॉपी करता यावी यासाठी गावकरी परीक्षा केंद्राबाहेर थांबतात.

## मुंडे, कोकाटे विरोधी पक्षाच्या रडारवर

### स्वारगेट अत्याचाराचा मुद्दा गाजणार : उद्यापासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मुंबई ।** पुण्यातील स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर झालेला अत्याचार, बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्ती वाल्मिक कराडला झालेली अटक, मुंडेंच्या कारकीर्दीत कृषी साहित्य खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप, बनावट कागदपत्रांच्या प्रकरणात कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने सुनावलेली शिक्षा, राज्याच्या अनेक भागात गंभीर बनलेला कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आदी मुद्द्यांवरून राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन वादळी



ठरण्याची शक्यता आहे. वादग्रस्त मंत्र्यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीवर विरोधी पक्ष ठाम असल्याने मुंडे, कोकाटे संपूर्ण अधिवेशनात विरोधकांच्या रडारवर असणार आहेत. त्यामुळे हे अधिवेशन प्रचंड बहुमतातील सत्ताधारी पक्षासाठी कसोटी पाहणारे ठरू शकते.

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्या, सोमवारपासून सुरुवात होत आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जाणार आहे.

स्वारगेट अत्याचार प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली असली तरी या घटनेने महिला सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी आघाडी सरकारने शक्ती विधेयक मंजूर करून ते मंजुरीसाठी केंद्र सरकारला सादर केले होते. मात्र, केंद्राने या विधेयकातील तरतुदी फेटाळून लावत राज्य सरकारला विधेयक मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे शक्ती विधेयकावरूनही विरोधी पक्षाकडून सरकारला जाब विचारला जाईल.

PATANJALI® wellness
Yoga, Ayurveda & Naturopathy

Yoggram and Niramayam

अॅलोपॅथी डॉक्टरांसाठी होळीपर्यंत उपचारांची विशेष भेट

MD, MBBS, सर्जन, दंतचिकित्सक, त्वचा तज्ज्ञ, ENT, नेत्ररोग तज्ञ, अस्थिरोग, स्त्रीरोग तज्ञ, हृदयरोग तज्ञ यांसारख्या ॲलोपॅथी डॉक्टरांसाठी पतंजली वेलनेस, निरामयम आणि योगग्राम येथे विशेष सवलत.

सेवा देणाऱ्या डॉक्टरांना ५०% सवलत | सेवानिवृत्त डॉक्टरांसाठी १००% मोफत

ज्याने मानवतेचा फायदा होतो त्यांना आम्ही समर्पित आहोत

आपल्या सनातन संस्कृतीत आपण आजारांनी त्रस्त असलेल्या आणि मानवतेच्या सेवेत गुंतलेल्या डॉक्टरांना देव मानतो, पण हृदयाला दुखावणारी वेदना ही आहे की रुग्णांची सेवा करताना डॉक्टरही रुग्ण होतात. अति व्यस्ततेमुळे आणि निरोगी जीवनशैली, योगासने, सकस आहाराच्या सवयींचे पालन न केल्यामुळे ते बीपी, थायरॉईड, शुगर, दमा, यकृत, किडनी, हृदयाच्या समस्या, ग्रीवाचे दुखणे आणि लठ्ठपणा या आजारांच्या चक्रात अडकतात.

आम्ही सर्व डॉक्टरांना अत्यंत प्रेम, आदर आणि करुणेने शुभेच्छा देतो.
पतंजली तुम्हाला निरोगीपणा, योगग्राम, निरामयसाठी आमंत्रित करते

त्यांची सर्व जीवनशैली आणि असाध्य रोग आम्ही वैज्ञानिक दृष्टिकोनाने व्यवस्थापित करू, उलट करू आणि नष्ट करू आणि पंचकर्म आणि शतकर्माद्वारे त्यांचे शुद्धीकरण करू या आश्वासनासह. जे सक्षम आहेत त्यांना ५०% सवलत देखील दिली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला ५ ते १० हजार रुपये किमतीच्या १० थेरपी दररोज दिल्या जातात. शिरोधारा, अभ्यंग, बाह्य आणि अंतर्गत बस्ती, हायड्रोथेरपी, कोलन थेरपी, शृंगी, वात मोक्षन, रक्त मोक्षन, क्युपंक्चर, क्युप्रेशर, ओझोन थेरपी, यज्ञ थेरपी आणि अशा अनेक रोग-आधारित उपचारांद्वारे दररोज डिटॉक्स करा आणि योग आणि आयुर्वेदाचा वारसा अनुभवा.

विशेष - सरकारी किंवा खाजगी नोकरीनंतर निवृत्त झालेल्या आणि ज्यांच्याकडे आर्थिक साधन नाही अशा डॉक्टरांना योग, आयुर्वेद, पंचकर्म, शतकर्म यांचे १००% मोफत उपचार करून सेवा करण्याचे सौभाग्य मिळावे अशी आमची इच्छा आहे.




*T&C apply

टीप- २५% सूट (सवलत) टाइप १ मधुमेह, यकृत, मूत्रपिंड निकामी, कर्करोग, ऑटो इम्यून डिसीजच्या रुग्णांसाठी केवळ मार्च महिन्यात उपलब्ध असेल.

पतंजली वेलनेसमध्ये साप्ताहिक उपचार आणि नोंदणीसाठी संपर्क करा.
8954666111, 8954666222, 8954666333 (Working hours - 6 am to 10 pm),
or visit: www.patanjaliwellness.com | booking@patanjaliwellness.com
जर तुम्हाला ऑनलाइन पेमेंट कसे करायचे हे माहित नसेल, तर तुम्ही येथे येऊन थेट नोंदणी करू शकता.